महाराष्ट्र पोलीस
# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक ०३/०२/२०२२

**" सोशल मिडियावर अश्लिल भाषा वापरुन व्हिडीओ प्रसारीत करुन समाजातील मुला-मुलींची नितीभ्रष्ट होण्यास व मानसिक स्थिती बिघडविण्यास कारणीभुत ठरणाऱ्या थेरगाव क्विनच्या सोबतीला सामाजिक सुरक्षा पथकाने केले अटक "**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश यांनी सोशल मिडीया साईटवर आक्षेपार्ह पोस्ट प्रसारीत करणाऱ्या इसमांवर लक्ष ठेवण्यासाठी सोशल मिडीया सेल तयार करुन त्यांचेमार्फत झिरो टॉलरन्स अंतर्गत तसेच **Thergaon-QueeN** या नावाचे अकाऊंटद्वारे व्हायरल झालेले अश्लिल व्हिडीओवर कायदेशीर कारवाई करणे संदर्भात दिलेल्या सुचनाप्रमाणे सामाजिक सुरक्षा विभागाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांनी पोउपनि श्री. प्रदिपसिंग सिसोदे, पोउपनि श्री. धैर्यशिल सोळंके व सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी टिम तयार केली होती.

दिनांक २९/०१/२०२२ रोजी संगिता गोडे, महिला पोलीस उप-निरीक्षक यांनी तक्रार दिली की, Thergaon-QueeN या नावाचे अकाऊंट चालविणारी मुलगी नामे साक्षी हेमंत श्रीश्रीमल रा. थेरगांव, पुणे हिने तिचे सोबत असणारा मुलगा नामे कुणाल कांबळे रा. गणेशपेठ (पुर्ण नांव पत्ता माहित नाही) व एक मुलगी साक्षी राकेश कश्यप रा. चिंचवड, पुणे असे तिघांनी मिळुन सार्वजनिक ठिकाणी अश्लिल भाषा व शब्द वापरले तसेच धमकीवजा अनेक व्हिडीओ तयार करुन ते सोशल मिडीयावर प्रसारित केले. त्यामुळे सदरचे व्हिडीओ पाहुन व ऐकुन समाजातील मुला-मुलींची नितीभ्रष्ट होण्यास व मानसिक स्थिती बिघडविण्यास कारणीभुत होत असल्याने त्यांचेविरुध्द भादंवि कलम २९२, २९४, ५०६, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्ह्यातील महिला नामे १) साक्षी हेमंत श्रीश्रीमाळ वय १८ वर्षे रा. मातोश्री बिल्डींग, तिसरा मजला, पवार नगर-३, थेरगांव, पुणे २) साक्षी राकेश कश्यप वय १८ वर्षे रा. पत्राशेड, लिंकरोड, जलशुध्दीकरण जवळ, पत्राचाळ, पिंपरी, पुणे यांना वाकड पोलीसांनी दिनांक ३०/०१/२०२२ रोजी अटक करण्यात आले होते.

दाखल गुन्ह्यातील पाहिजे आरोपी कुणाल कांबळे हा फरार असल्याने सामाजिक सुरक्षा विभागाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या टिमने तांत्रीक विश्लेषणाद्वारे व सामाजिक सुरक्षा पथकातील पोलीस अंमलदार मारुती करचुंडे यांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे दाखल गुन्ह्यातील फरार आरोपी नामे कुणाल राजु कांबळे वय २६ वर्षे रा. २२७ नाडे गल्ली, गणेशपेठ, पुणे यास जंगली महाराज रोड, चौपाटी, शिवाजी नगर, पुणे या ठिकाणाहुन सापळा रचुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली असुन पुढील तपास वाकड पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. काकासाहेब डोळे, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. पद्माकर घनवट, पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्री. प्रदिपसिंग सिसोदे, पोउपनि श्री. धैर्यशिल सोळंके पोलीस अंमलदार विजय कांबळे, किशोर पढेर, संतोष बर्गे, नितीन लोंढे, स्वप्निल खेतले, दत्तात्रय गोरे, अमोल साडेकर, अमोल शिंदे, जालिंदर गारे, सचिन गोनटे, मारुती करचुंडे, राजेश कोकाटे, गणेश कारोटे, दिपक शिरसाट, अतुल लोखंडे, सुमित डमाळ, योगेश तिडके, सुधा टोके, वैष्णवी गावडे, संगिता जाधव रेशमा झावरे यांनी केली आहे.

**( डॉ. काकासाहेब डोळे )**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड.